## घटक – ३

# स्वनिम व रुपिम विचार (स्थूल परिचय)

### ३.१ उद्दिष्टे

१. स्वनविचाराची ओळख होईल.

२. स्वनिमविचार समजण्यास मदत होईल.

३. रूपविचारांचा परिचय होईल.

४. रुपिमविचार समजून घेता येईल.

५. स्वनांतर विचाराची संकल्पना समजण्यास मदत होईल.

६. रुपिकांतर विचाराची संकल्पना समजण्यास मदत होईल.

### (अ) स्वनिम विचार

### ३.२ प्रास्ताविक

विसाव्या शतकात वर्णनात्मक भाषाविज्ञानाचा पाया फेर्दिना द सोस्यूर यांनी घातला. यांनी 'रूप, व्यवस्था आणि संरचना' या अमूर्त संकल्पनांना केंद्रस्थानी मानले. भाषाअभ्यासाकडे ऐतिहासिक दृष्टिकोणातून न पाहता भाषेच्या एककालिक स्थितीवर लक्ष केंद्रीत केले आणि या स्थितीत भाषेची संरचना कल्पून या संरचनेचे विश्लेषण करण्यावर भर दिला. त्याच्या या दृष्टिकोणामुळे भाषाअभ्यासाची एकूण मांडणीच बदलली.

भाषाशास्त्रात संरचनात्मक किंवा वर्णनात्मक भाषाशास्त्राला अधिक महत्त्व आहे. स्वनविज्ञान संरचनात्म भाषाशास्त्राचा एक भाग आहे. स्वविज्ञान जगातील सर्व भाषांचा अभ्यास करून स्वन ठरविते. त्यामुळे स्वनविज्ञान भाषानिरपेक्ष असते. कोणत्याही एका विशिष्ट भाषेचाच विचार न करता सर्व भाषांचा अभ्यास करून स्वनविज्ञान स्वनव्यवस्था निश्चित करते.



Scanned with OKEN Scanner

## ३.३ स्वनविचार

मौखिक स्वरूपातील भाषेमध्ये योजल्या जाणाऱ्या ध्वनींना 'स्वन' म्हणतात. म्हणूनच भाषा ही स्वनरूप व्यवस्था असते. असेही संबोधले जाते. मानव आपल्या मुखावाटे असंख्य ध्वनी निर्माण करीत असतो. मानवी मुखाद्वारे निर्मित झालेल्या विविध ध्वनींपैकी निवडक ध्वनींना 'स्वन' असे म्हणतात. अर्थात स्वन हे भाषेमध्ये माध्यम म्हणून असतात. परंपरेने भाषेत योजलेले स्वन कालांतराने बदलू शकतात. भाषेतील काही स्वन व्यवहार वापरातून दूर जातात; तर काही स्वने नव्याने स्वीकारले जातात. उदा. मराठी भाषेच्या व्यवहारातून (वर्णमालेतून) कालबाह्य झालेले दीर्घ 'ऋ, ॡ' हे ध्वनी आहेत तर इंग्रजी भाषासंपर्कामुळे अपरिहार्यता म्हणून स्वनविचारास अधिक स्पष्ट करणाऱ्या व्याख्या पुढीलप्रमाणे,

''स्वन म्हणजे भाषेत उपयोगात आणलेला ध्वनी'' - **श्री. न. गजेंद्रगडकर**

''मानवी मुखावाटे बाहेर पडणाऱ्या या ध्वनीना स्वन असे म्हणतात. स्वन भाषेचे माध्यम आहे, भाषा स्वनरूप असते.'' – **डॉ. द. भि. पुंडे.**

स्वनविचार हा एकाअर्थी ध्वनिविचारच आहे. पण सूक्ष्म विचार करता स्वनविचार ही ध्वनिविचाराची पुढची पायरी आहे. मौखिक स्वरूपात बोलल्या जाणाऱ्या भाषेतील ध्वनीचा विचार स्वनविचारात होत असतो. हा विचार शास्त्रीय पद्धतीने केला जातो. त्यास 'स्वनविज्ञान' असे संबोधले जाते. म्हणून 'स्वनविज्ञान' हे स्वनाचा विचार करणारे शास्त्र आहे, हे ओघानेच स्पष्ट होते. विशिष्ट स्वन निर्मिती कशी होते. त्या स्वनाची वातावरणातून ध्वनितरंगाच्या आधारे श्रवण करण्यापर्यंतची प्रक्रिया कशी घडते. त्याचबरोबर त्या ध्वनीचा मानवी मेंदू-मनावरील परिणाम इत्यादी पातळीवर स्वनाचा अभ्यास केला जातो. यावरून स्वनविज्ञानाच्या तीन शाखा कल्पिल्या आहेत. १. उच्चारकेंद्री स्वनविज्ञान, २. संचारणकेंद्री स्वनविज्ञान आणि ३. श्रवणकेंद्री स्वनविज्ञान इत्यादी आहेत. या शाखांपैकी उचारणकेंद्री स्वनविज्ञान या शाखेला भाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीमध्ये लक्षणीय महत्त्व आहे. कारण भाषेच्या वर्णनासाठी भाषेतील स्वनाचे वर्णन, वर्गीकरण आणि विश्लेषण महत्त्वाचे असते. हे उच्चारकेंद्री अभ्यासामुळेच शक्य होते. त्यामुळेच स्वनविज्ञानाची ही शाखा वर्णनात्मक भाषाविज्ञानास उपयुक्त आहे.

## ३.३ स्वनविज्ञानाच्या तीन शाखा

स्वनविज्ञानाच्या प्रमुख तीन शाखा पडतात. स्वन हा उच्चारला जातो. उच्चारलेला स्वन वातावरणात प्रसृत होतो आणि वातावरणात प्रसृत झालेला स्वन श्रोत्याकडून श्रवण केला जातो. यातील प्रक्रियांच्या आधारे स्वनविज्ञान स्वनांचा अभ्यास करते. त्याआधारे खालील तीन स्वनविज्ञानांच्या शाखा कल्पिलेल्या आहेत.



Scanned with OKEN Scanner

### १. उच्चारकेंद्री स्वनविज्ञान

या शाखेमध्ये स्वनाची निर्मिती कशी होते ? स्वननिर्मितीचे उगमस्थान कोणते ? उच्चारक्रिया कोणत्या स्वरूपात होते ? याचा विचार केला जातो. याबाबत डॉ. पुंडे यांनी मांडलेले मत अधिक महत्त्वपूर्ण आहे. ते म्हणतात, ''वागेंद्रियाच्याद्वारे स्वन उच्चारला जात असताना जी प्रक्रिया घडते, तिच्या अभ्यासाला उच्चारणकेंद्री स्वनविज्ञान किंवा औच्चारिक स्वनविज्ञान म्हणतात.'' त्या आधारे स्वनाचे स्वरूप त्यांच्यातील साम्य-भेद व वर्गीकरण केले जाते.

### २. संचारकेंद्री स्वनविज्ञान

मुखाद्वारे उच्चारलेले ध्वनी (स्वन) वातावरणात संचारित होतात. स्वनलहरीचे कंपन होते. स्वनाचा हवेत संचार होतो. हवेत निर्मित झालेल्या ध्वनिलहरीच्या अभ्यासाला 'संचारणकेंद्री स्वनविज्ञान' असे संबोधतात. मात्र हा अभ्यास पदार्थविज्ञान, गणित यांच्या अभ्यासांतर्गत येत असल्यामुळे त्याचा विचार भाषाशास्त्रात फारसा केला जात नाही.

### ३. श्रवणकेंद्री स्वनविज्ञान

मुखावाटे बाहेर पडलेले ध्वनी वातावरणात कंपन पावतात. ते ध्वनी श्रोत्यांकडून श्रवण केले जातात. त्या प्रक्रियेचा विचार श्रवणकेंद्री स्वनविज्ञानाच्या शाखेत केला जातो. पण या स्वरूपाचा अभ्यास 'शरीरशास्त्रात केला जात असल्यामुळे भाषाशास्त्रात महत्त्वाचा ठरत नाही.

## ३.४ स्वनाचे गुणविशेष

'स्वन' भाषा निरपेक्ष असतात. कारण कोणत्याही भाषेमध्ये योजल्या जाणाऱ्या ध्वनींना 'स्वन' ही संज्ञा योजली जाते. स्वनांना मुल्यात्मकता व आकार देण्याचे कार्य भाषा करत असते. या स्वरूपाच्या स्वनांना काही गुणविशेष असतात. ते पुढीलप्रमाणे -

**१. व्यक्तिनिष्टता** : मानवी मुखाद्वारे स्वनाची निर्मिती होत असते. तरी स्वनाच्या भाषिक वापरामध्ये व्यक्तिविशिष्टता दिसून येते. व्यक्तीचे लिंग, वय, व्यवसाय, प्रदेश इत्यादीनुसार त्याची विशिष्टता परिवर्तीत होताना दिसते.

**२. विभेदकता** : भाषाव्यवहारामध्ये योजल्या जाणाऱ्या ध्वनींच्या अंगी असलेल्या गुणविशेषामध्ये अर्थभेद निर्मितीचे सामर्थ्य असते. याच प्रक्रियेला स्वनांची विभेदकता म्हणतात. भाषाव्यवहारामध्ये सुट्या, स्वतंत्र योजलेल्या स्वनांना काही स्थान नाही, परंतु विशिष्ट रचनेमध्ये वापरलेल्या स्वनाला अर्थ प्राप्त होतो. एक स्वन वेगवेगळ्या रचनेमध्ये भिन्न भिन्न अर्थ प्राप्ती करत असतात. अशा रचनेमधूनच विभेदकता सिद्ध होत असते.



Scanned with OKEN Scanner

**३. लवचिकता** : स्वनाच्या अंगी लवचिकतेचा गुणधर्म असतो. याच गुणधर्मामुळे स्वनाना अर्थप्राप्ती होत असते. उच्चारणातील बलाघात, चढ-उतार इत्यादीमुळे अर्थभेद निर्मिती करता येते. यामागील कारण म्हणजे स्वनांच्या अंगी असणारी लवचिकता होय.

## ३.५ स्वनिमविचार

विशिष्ट भाषेतील स्वन म्हणजे स्वनिम. क, ट, प, र यासारखे ध्वनी जगभरातील सर्व भाषांमध्ये आढळतात, ते स्वन होत. परंतु मराठी भाषेतही ते आढळत असल्यामुळ ते मराठी भाषेचे स्वनिम होत. डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी म्हटले आहे, ''स्वनविज्ञानाचे क्षेत्र भाषानिरपेक्षतेमुळे व्यापक असते तर स्वनिमविन्यासाचे भाषासापेक्षतेमुळे मर्यादित असते.'' म्हणूनच डॉ. जोगळेकरांनी म्हटले आहे, ''वस्तुतः मराठीचा स्वनिमविन्यास, तामिळचा स्वनिमविन्यास अशा भाषासापेक्ष शब्दयोजनाच करायला पाहिजे.'' प्रत्येक समाजगटाची, व्यक्तीची भाषा भिन्न भिन्न असली तरी त्या सर्वांना समानभूत उच्चार व्यवस्था असते.

विशिष्ट भाषासमूहाचा समान वर्ग गृहीत धरूनच स्वनिमविचार मांडला जातो. याचा अर्थ असा की, मराठी, हिंदी, गुजराती, कन्नड इत्यादी विशिष्ट भाषेतील स्वनाचा विचार म्हणजे स्वनिमविचार होय.

## ३.६ स्वनिमांची व्याख्या

एखाद्या विशिष्ट भाषाव्यवहारातील स्वन म्हणजे स्वनिम, दोन स्वनाचे उच्चारस्थान, उच्चारणपद्धती समान असली तरी एखादे असे लक्षण असते की ज्यामुळे त्या दोन स्वनांमध्ये खूप मोठा फरक पडतो. शब्दाचे अर्थ पूर्णतः बदलतात. उदाहरणार्थ पळ (प्+अ+ळ्+अ), बळ (ब्+अ+ळ्+अ) या शब्दामध्ये 'प' आणि 'ब' दोन्ही स्वन (ध्वनी) ओष्ठ्य आहेत. पण 'प' च्या ठिकाणी 'ब' हे स्वतंत्र व भिन्न स्वन आहेत. याबाबत श्री. न. गजेंद्रगकर यांनी स्वनिमाची व्याख्या करताना म्हटले आहे. ते असे,

**''ज्या विशेषक लक्षणामुळे दोन शब्द भाषेत अलग समजले जातात. त्यांना स्वनिम म्हणतात.''**

**''भाषेच्या स्वनिम पद्धतीतील एकमेकांशी वैधर्म्याने राहणारे घटक म्हणजे स्वनिम... विशेष लक्षणयुक्त स्वन म्हणजे स्वनिम.''**

या दोन्हीही स्वनिमविचार व्याख्यातून श्री. न. गजेंद्रगडकर यांनी समान उच्चारस्थान असलेल्या स्वनाचा अर्थ भिन्न-भिन्न असतो हेच सुचविले आहे.

याच अनुषंगाने व्याख्या करताना डॉ. द. दि. पुंडे यांनी म्हटले आहे.

**''ज्यांच्यामध्ये स्वनिम साम्य आहे, ज्यांच्यातील आजुबाजूच्या परिस्थितीमुळे होणारे फरक, होणारी परिवर्तने अंदाजक्षम आहे, अशा ध्वनीच्या समुहास स्वनिम म्हणतात आणि या समुहात समाविष्ट असणाऱ्या ध्वनींना स्वनांतरे म्हणतात.''**

एखादी विशिष्ट भाषा ज्या एका विशिष्ट ध्वनीचा भाषाभिव्यक्तीसाठी उपयोग करते तो ध्वनी म्हणजे स्वनिम होय. परंतु असा ध्वनी प्रत्येक वेळी, प्रत्येक प्रसंगी विशिष्ट प्रकारेच उच्चारला जातो असे



Scanned with OKEN Scanner

नसते. प्रत्यक्षात बोलणारा तो विशिष्ट ध्वनी विविध प्रकारे उच्चारला जातो. त्यामुळे एकाच ध्वनीची विविध रूपे निर्माण होतात. अशा असंख्य रूपांना स्वनांतर म्हणतात. अशा विशिष्ट ध्वनीची असंख्य रूपे होत असली तरी त्या सर्व स्वनांतराचा प्रतिनिधी म्हणूनच तो एक ध्वनी योजला जातो. त्यालाच 'स्वनिम' असे संबोधले जाते. स्वनिमविचारातून ध्वनीची निर्मिलेली ही व्यवस्था नवीन आहे. या स्वनिमाचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट होईल.

**/ग/(स्वनिम)**
- बाग–ग$^{१}$ (स्फोटहीन ध्वनी)
- जागी–ग$^{२}$ (पुढच्या बाजूने उच्चार)
- गुलाम–ग$^{३}$ (मागच्या बाजूने उच्चार)
- नागपूर–ग$^{४}$ (घोष असूनही अघोष)
- गती–ग$^{५}$ (सघोष मृदूतालव्य स्पर्शव्यंजन)

वरील उदाहरणामध्ये 'ग' हा ध्वनी भिन्नभिन्न ठिकाणी आला आहे. तसाच तो वेगवेगळ्या ध्वनीच्या सहवासात आलेला आहे. त्यामुळे प्रत्येक शब्दातील 'ग' चे उच्चारण भिन्न जाणवते. प्रस्तुत ठिकाणी ग$^{१}$, ग$^{२}$, ग$^{३}$, ग$^{४}$, ग$^{५}$ ही 'ग' या ध्वनीची स्वनांतरे आहेत. तर 'ग' हा स्वनिम आहे.

स्वनिम अन्य शब्दांच्या सहवासातून स्वनांतरे निर्माण होतात. याबाबत डॉ. जोगळेकर यांनी महत्त्वाचे निरीक्षण नोंदविलेले आहे. ते म्हणतात, ''कोणताही स्वन विशिष्ट भाषेत उपयोगात येतो तेव्हा तो कोणत्या ना कोणत्या परिसरात असतो त्याचा आधीचा किंवा नंतरच्या उच्चारणाचा परिणाम त्यावर होत असतो. लेखनाच्या मर्यादेमुळे असा 'स्वन' सर्वत्र सारखा 'दिसत' असला तरी तो तंतोतंत सारखा 'असत' नाही...... लेखनदृष्ट्या प्रत्येक गटातील स्वन सारखे दिसत असले तरी वस्तुतः त्याचे उच्चारण वेगवेगळे आहे हे आपल्या कानांना जाणवते.'' डॉ. जोगळेकर यांच्या या निरीक्षणावरून स्वनिमाचे स्वनांतरात होणारे रूपांतर समजण्यास मदत होते.

वरील उदाहरणात 'ग' च्या उच्चारणाची पाच रूपे आढळली तरी सर्व प्रकारचा 'ग' ध्वनीचे उच्चारस्थान, उच्चारप्रक्रिया एकच असल्याने, त्यांच्यात स्वनिक साम्य आहे. यामुळे 'ग' हा स्वनिम समजला जातो.

## ३.७ स्वनिमांची वैशिष्ट्ये

वरील चर्चेवरून स्वनिम संकल्पना समजण्यास मदत होते. वरील चर्चेच्या आधारे स्वनिमाची वैशिष्ट्ये नोंदविता येतात. ही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे,

१. स्वनिम ही कल्पना असून, स्वनांतरे ही स्वनिम कल्पनेची प्रात्यक्षिके असतात.

२. विशिष्ट भाषेमध्ये ध्वनीचा विनियोग कोणत्या स्वरूपात केला जातो यादृष्टीने स्वनिम विचारात महत्त्व असते.



Scanned with OKEN Scanner

३. भाषेची लिपी निर्मिती स्वनिमामुळे शक्य होते.

४. साधर्म्य-वैधर्म्याच्या आधारे स्वनिमव्यवस्था निश्चित करण्यात येते.

५. भाषेतील लघुतम अखंड घटक स्वनिम असतो. स्वनिमाचे विभाजन होत नाही. उदा. 'अमित' या शब्दात अ+म्+इ+त् स्वनिम संख्या चार आहे. पण 'अ्, म्, इ् , त् या स्वनिमाचे आणखी विभाजन करता येत नाही.

६. स्वनिम हा स्वनांतरचा लघुत्तम प्रतिनिधी असतो. भाषेत स्वनांतरे वापरली जातात. स्वनिम वापरले जात नाहीत.

७. स्वनिम भाषेत वापरल्यानंतर त्याचे रूपांतर स्वनांतरात होते. स्वनिम भाषेची आदर्श कल्पना असते, तर स्वनांतरे भाषेचे प्रात्यक्षिक आहे.

८. स्वनिम व स्वनांतर यांचा विचार भाषा सापेक्षपणे करावा लागतो. त्यांचा विचार कोणत्या तरी विशिष्ट भाषेच्या संदर्भातच करावा लागतो. उदा. मराठीतील स्वनिम, गुजरातीतील स्वनिम, तमिळीतील स्वनिम इत्यादी.

९. उच्चारदृष्ट्या साधर्म्य असलेल्या स्वनांचा गट करून स्वनिमाचा शोध घेतला जातो. तर वैधर्म्य असणाऱ्या भिन्न स्वनिमांच्या आधारे स्वनिमव्यवस्था मांडली जाते.

१०. सर्व भाषेमध्ये मोजके स्वन असतात. पण प्रत्येक भाषेची स्वनिम व्यवस्था भिन्न-भिन्न असते.

११. मौखिक भाषेच्या संदर्भातच स्वनिमविचार केला जातो. लिखित भाषेच्या संदर्भात स्वनिमविचार केला जातो.

## ३.८ स्वनिम विनियोगाचे तत्त्व

एखादा ध्वनी त्या विशिष्ट भाषेतील स्वनिम आहे किंवा नाही, आहे तर त्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये, लक्षण कोणते ? हे पाहण्यासाठी त्या ध्वनीचा त्या भाषेतील व्यवहार कसा होतो ? ध्वनी कोणते कार्य करतो ? त्याचा विनियोग कसा केला जातो ? इत्यादी बाबींचा विचार केला जातो.

भाषा व्यवहारामध्ये स्वनिमांचा विनियोग तीन प्रकारांनी होत असतो. ते प्रकार पुढीलप्रमाणे आहेत,

१. **वैधर्म्ययुक्त विनियोग** : वैधर्म्ययुक्त विनियोगाला 'व्यवच्छेदक विनियोग' असेही संबोधले जाते. स्वनिम निश्चितीचे महत्त्वाचे तत्त्व म्हणूनही त्यास ओळखले जाते. दोन स्वन नेमके एकाच स्वनिम परिघामध्ये येतात तेव्हा त्यांचा विनियोग वैधर्म्ययुक्त अथवा व्यवच्छेदक असतो. यामध्ये दोन स्वनातील सूक्ष्म साम्यापेक्षा सूक्ष्म भेदाकडे अधिक लक्ष दिले जाते. स्वनिम परिघातील एकच शब्द भिन्न असतो. या भिन्न शब्दामुळे दोन शब्द अर्थदृष्ट्या भिन्न ठरतात. या विनियोगास वैधर्म्ययुक्त विनियोग असे संबोधतात. उदा. 'क' आणि 'ग' ही दोन्ही स्पर्श व्यंजने अल्पप्राण असून उच्चारणस्थान मृदूतालू आहे. मात्र 'क' चे उच्चारण अघोष तर 'ग' चे उच्चारण घोष आहे.



Scanned with OKEN Scanner

घर-मर, चाल-चाळ या उदाहरणामध्ये घ/म/ल/ळ हे स्वनिम आहेत. या दोन उदाहरणांमध्ये प्रत्येकी एक स्वन भिन्न आहे. त्यामुळे दोन शब्द अर्थदृष्ट्या भिन्न आहेत.

२. **पूरक विनियोग** : या तत्त्वामध्ये उच्चारणसाम्य असणारे दोन भिन्न स्वन वेगळ्या स्वनिम परिघात योजले जातात. या तत्त्वामध्ये अर्थसाम्याला अधिक महत्त्व दिले जाते तर अर्थभेदाला गौण स्थान दिले जाते. परस्पराच्या जागी उपयोगी न येणारा परंतु परस्पर पूरक असणाऱ्या उपयोगितास 'पूरक विनियोग' असे संबोधतात. उदा. 'कर्म या शब्दातील 'क' पेक्षा 'कर्ण' या शब्दातील 'क' भिन्न आहे. दोन्ही 'क' मध्ये उच्चारणदृष्ट्या भिन्नता असल्यामुळे हे स्वनिम परस्पराची जागा घेऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यात पूरक विनियोग आहे. भाषेत योजलेली स्वनांतरे या स्वरूपाची असतात.

२. **स्वच्छंद किंवा मुक्त विनियोग** : या तत्त्वाला 'वैकल्पिक विनियोग' असेही संबोधले जाते. दोन स्वन एकाच ध्वनिपरिसरात येतात आणि तरीही त्यांच्यामुळे दोन शब्द अर्थदृष्ट्या वेगळे ठरत नाहीत, या स्वरूपात स्वनांचा विनियोग होतो तेव्हा त्यास स्वच्छंद विनियोग म्हणतात.

स्वच्छंद किंवा मुक्त परिवर्तन दोन स्वनिमांमध्ये होऊ शकते. त्याप्रमाणे दोन स्वनांतरामध्ये होऊ शकते. उदा. असं-आसं, आमचे-अमचे, रहातो-राहतो या उदाहरणामध्ये उच्चारदृष्ट्या भिन्न स्वन येऊनसुद्धा अर्थदृष्ट्या भेद दिसून येत नाही. अर्थदृष्ट्या भेद नसल्यामुळे वैधर्म्ययुक्त ठरत नाही. त्यामुळे या स्वनांना स्वनिमाचा दर्जा मिळत नाही.

## ३.९ स्वनिमांचे प्रकार

स्वनिमांची निश्चिती झाल्यानंतर त्याचे विशिष्ट असे वर्गीकरण करता येते. ते दोन प्रकारे -

१. **खंडयुक्त स्वनिम** : भाषाव्यवहारात खंडाधिष्ठित अथवा पराखंडकी स्वनिमांचे साह्य घ्यावे लागते. कोणत्याही भाषेमध्ये या प्रकारचे दोन स्वनिम आढळतात. खंडयुक्त स्वनिम प्रकारामध्ये स्वर, अर्धस्वर, व्यंजन इत्यादींना खंडयुक्त स्वनिम म्हणून ओळखतात.

२. **खंडाधिष्ठित/पराखंडकीय स्वनिम** : भाषाव्यवहारात खंडाधिष्ठित अथवा पराखंडकीय स्वनिमांचे साह्य घ्यावे लागते. स्वरांचा चढउतार, एखाद्या घटकावर दिला जाणारा जोर, एखाद्या स्वन उच्चारात नाकावाटे बाहेर जाऊ दिलेली हवा या सर्व क्रियांमुळे बोलणे परिणामकारक, चैतन्यपूर्ण, कलात्मक होत असते. हे स्वनिम पराखंडीय म्हणजे परावलंबी असतात. अलिकडे हे स्वनिम विरामचिन्हे, संदर्भचिन्हे या स्वरूपात दर्शविली जातात. **खंडाधिष्ठित स्वरांचे उपप्रकार पुढीलप्रमाणे -**

१. **नासिक्यरंजन** : ङ्, ण्, म्, न् ही अनुनासिके मराठीत आहेत. याचा उच्चार करताना नासिक विवराचा उपयोग होतो. परंतु इतर व्यंजने व स्वर यांचेही स्वानुनासिक उच्चार करता येऊ शकतात. उदा. ॲ ( ˘ ही नासिक्य व्यंजनाची खूण आहे.



Scanned with OKEN Scanner

२. **आघात** : एखाद्या शब्दातील एखाद्या अक्षरावर किंवा वाक्यातील एखाद्या शब्दावर दाब, जोर दिला जातो. भाषा व्यवहारात ही अवस्था अनेक वेळा दिसून येते. आघात हा सभिप्राय असतो. वाक्याचे ध्येय त्यातून साध्य होते.

उदाहरणार्थ, **त्याने** काम केले. - दुसऱ्या कोणी नाही त्याने

त्याने **काम** केले. - दुसरे काही नाही तर काम केले.

त्याने काम **केले**. - आश्चर्य व्यक्त होते.

३. **सुरावली** : स्वराचा चढउतार म्हणजेच सुरावली होय. पद, वाक्य, पदसमूह या सर्व संदर्भात सुरावलींचा उपयोग होतो. प्रश्न, आश्चर्य इत्यादी भाव सुरावलीद्वारे प्रकट होतात. वेगळेपणा, भिन्न अर्थ प्रकट करणे सुरावलीत शक्य होते. या योजनेत व्यक्तीनुसार विशिष्टता आढळते.

४. **विराम** : विराम यालाच सीमासंधी असेही म्हणतात. बोलताना शब्द, वाक्य विलगतेसाठी आपण अल्प विश्रांती घेतो यालाच अल्पविराम असेही म्हणतात. हे विराम लेखनात सुट्या शब्दांनी दर्शविले जातात.

उदाहरणार्थ, ते खाऊन ये - ते खाऊ नये.

सांगितलेले काम करूनच ये - सांगितलेले काम करू नये.

## ३.१० मराठीची स्वनिम व्यवस्था

वरील विवेचनाच्या आधारे स्वनिमाचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट झालेली आहेत. त्या आधारे खालील प्रकारे स्वनिम मानले आहेत.

### स्वर स्वनिम

इ, ए, अॅ, आ, ऑ, ओ, उ - आठ स्वनिम (ई, ऊ, ऋ, ऌ, ऐ, औ, ऐ) इत्यादी स्वनिम मानले नाहीत.

### व्यंजन स्वनिम

आधुनिक व्याकरणकारांनी स्वनिमविज्ञानाच्या आधारे मराठीत ५ व्यंजन स्वनिम मानले आहेत. त्यातून पारंपरिक व्यंजनव्यवस्थेतील ङ,ञ,ष हे ध्वनी स्वनिम स्वीकारलेले नाहीत. तर ऱ्ह, ल्ह, व्ह, म्ह, न्ह, ण्ह या महाप्राणयुक्त स्वनांचा मराठीत स्वनिम म्हणून स्वीकार केला आहे. इतर व्यंजन स्वनिम खालीलप्रमाणे -

क, ख, ग, घ,

च, छ, ज, झ (तालव्य)

च, छ, ज, झ (दंत्य)

त, थ, द, ध, न,



Scanned with OKEN Scanner

ट, ठ, ड, ढ, ण,

प, फ, ब, भ, म

य, र, ल, व

स, श, ह, ळ

ऱ्ह, व्ह, म्ह, न्ह, व्ह

ष, ळ, ह, ङ् हे स्वनिम वादग्रस्त असल्यामुळे ४२ व्यंजनस्वनिम मानले जातात.

### ३.८ स्वनांतर

एखाद्या भाषाव्यवहारात जे ध्वनी वापरले जातात त्यास स्वनिम म्हणतात. पण प्रत्यक्ष शब्दामध्ये त्याचा उपयोग होतो तेव्हा त्यांच्यावर मागील अथवा पुढील स्वनिमाचा परिणाम झाल्याने एकाच स्वनिमाचा उच्चार वेगवेगळ्या पद्धतीने होतो. त्यामुळे एकाच स्वनिमाची जी भिन्नभिन्न रूपे असतात त्यांना स्वनांतर म्हणतात. 'ग' या स्वनाचा उपयोग करून नागपूर, बाग, गुलाम, जागी इत्यादी शब्दातील प्रत्येक 'ग' चा उच्चार भिन्न स्वरूपाचा असला तरी त्यास स्वनांतरे समजले जाते.

स्वनिमाचा भाषेत उपयोग होताच त्याचे स्वनांतरामध्ये रूपांतर होते. म्हणजे स्वनिम ही एक आदर्श कल्पना आहे. तर स्वनांतरे कोणत्यातरी एका भाषेची विशेषके असतात. त्यामुळे त्याचा विचार भाषासापेक्ष करावा लागतो. परंतु स्वनिम आणि स्वनांतरे कोणत्या तरी एका भाषेची विशेषके असतात. त्यामुळे त्याचा विचार भाषासापेक्ष करावा लागतो.

स्वनांतर हे स्वन असतात पण प्रत्येक स्वन स्वनांतर असेलच असे नाही. स्वन भाषानिरपेक्ष असतात तर स्वनांतर हे भाषासापेक्ष असतात.

**स्वनिम आणि स्वनांतरे यांचे लेखन करण्याची विशिष्ट पद्धत भाषाविज्ञानामध्ये रूढ आहे. स्वनिम दोन तिरप्या रेषेत लिहिला जातो आणि स्वनिमची स्वनांतरे चौकोन कंसात दर्शविली जातात.**

### (ब) रुपिम विचार

भाषाव्यवहारामध्ये अर्थ, आशय, अभिव्यक्ती इत्यादी घटकांना महत्त्व असते. भाषाव्यवहारामध्ये आशयाबरोबर अभिव्यक्तीचा अंश असतो. या दोहोंमधील परस्परसंबंधाचा विचार रुपिम विचारामध्ये होते. रुपिम विचारालाच पदिमविचार असेसुद्धा संबोधले जाते. भाषा ही विविध वाक्याची रचना असते. ही वाक्यरचना शब्दांनी बनलेली असतात. उदा. 'रामाने रावणाला मारले'.... यांनाही शब्दच म्हणतो. आधुनिक भाषाशास्त्राला या संज्ञा अमान्य आहेत. त्यांनी 'शब्द' आणि 'पद' यांच्या संज्ञा बदलल्या आहेत. आधुनिक भाषाशास्त्रज्ञांच्या मते 'राम' रूप आहे, तर 'रामाने' रुपिम आहे. 'राम+ने' अशा दोन रुपिमांनी 'रामाने' हा शब्द बनला आहे. या स्वरूपाचा नवा विचार भाषाविज्ञानामध्ये मांडला आहे.



Scanned with OKEN Scanner

## ३.१ रूप आणि रुपिका

रुपिम विचारामध्ये विशिष्ट अनुक्रमाने ध्वनिसमूह निर्माण केला जातो. त्या ध्वनिसमूहाला गर्भीत अर्थप्राप्ती करून दिली जाते. तो ध्वनिसमूह आशययुक्त किंवा सार्थ ध्वनिसमूह असतो. या रूपाला अभिव्यक्ती व आशय ही दोन रूपे असतात. अशा पदरचनेला एकत्र आणून वाक्यरचना केली जाते. या प्रक्रियेला रुपविचार वा पदविचार असे म्हणतात.

विविध भाषाशास्त्रज्ञानी रुप, रुपिम रुपिकांतर या संकल्पनेच्या अर्थपूर्ण व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या व्याख्यांच्या आधारे रुप-रुपिम-रुपिकांतर यांची वैशिष्ट्ये समजण्यास मदत होते. त्या व्याख्या पुढीलप्रमाणे -

**''भाषेतील दुसऱ्या कोणत्याही शब्दाशी अंशतः स्वनिमिक अर्थात्मक साधर्म्य नसणारा लघुत्तम घटक म्हणजे पदिम (रुपिम) होय.''** - श्री. न. गजेंद्रगडकर

श्री. न. गजेंद्रगडकर यांच्या व्याख्येचा विचार करता त्यांनी रुपालाच रुपिम असे संबोधलेले आहे असे दिसते. पण रुप आणि रुपिम यांच्यामध्ये भेद असतो. या भेदाचे विस्तृत विवेचन करताना डॉ. पुंडे यांनी नोंदविलेले मत महत्त्वपूर्ण आहे. ते म्हणतात, **''भाषेमध्ये ध्वनीच्या ज्या अनेकविध रचना आढळतात, त्यापैकी काही रचनांचे आपण विघटन करू शकतो. म्हणजे त्यांचे घटक वेगळे काढू शकतो. असे विघटन करता करता एका अवस्थेला पोहोचतो की, त्यापुढे घटकाचे आणखी विघटन होऊ शकत नाही. अशी जी विघटन होऊ न शकणारी ध्वनीची सर्वात लहान अशी अर्थधारत रचना तिला पदे असे म्हणतात. पद हे व्याकरणाचा मुलभूत घटक होय. पद हे वाक्यात कधी स्वतंत्रपणे येऊ शकते, कधी इतर पदांच्या सहाय्याने येते. स्वतंत्रपणे येऊ शकणारे केवल पद अथवा इतर पदांच्या संयोगाने बनणारे पदांचे वाक्यातील प्रयोगक्षम रूप म्हणजे शब्द होय. शब्दाचे विघटन पदामध्ये होऊ शकते. पदे, त्यांचे प्रकार, त्याच्यापासून होणारी शब्दनिर्मिती इत्यादीचा विचार व्याकरणाच्या ज्या विभागात होतो त्याला आधुनिक भाषाशास्त्रामध्ये रूपविन्यास असे म्हणतात. रुप, रुपिम आणि रुपिकांतर ही पदविन्यासातील त्रयी होय. रुप म्हणजे ध्वनीची सर्वात लहान अशी अर्थवाहक रचना होय. रुपिम म्हणजे समान अर्थ असणाऱ्या व परस्परांशी पूरक विनियोगाने अथवा मुक्त पर्यायाने राहणाऱ्या व्याकरणिक समानता असणाऱ्या रुपसमूहाचा प्रतिनिधी. कोणताही रुपिम भाषिक व्यवहारात ज्या रूपात अविष्कृत होतो, त्या अविष्कृत रूपाला त्या रुपिमाचे रुपिकांतर असे म्हणतात.''** या सर्व विवेचनातून पद (रुप) पदिम (रुपिम) आणि पदान्तर (रुपिकांतर) या संकल्पनेतील सूक्ष्म छटा समजण्यास मदत होते. या संकल्पनेतील सूक्ष्म भेदही अर्थदृष्ट्या स्पष्ट होतात.

**रूपिका** : विघटन होऊ न शकणारी लहानात लहान अर्थवाहक रचना म्हणजे रूपिका होय. व्याकरणिक विश्लेषणातील तो लघुत्तम सार्थ घटक असतो. कोणत्याही रुपिकेचे तिचा अर्थ कायम ठेवून आणखी विघटन शक्य नसते. रूपिका वाक्यात कधी स्वतंत्रपणे येऊ शकते तर कधी इतर रूपिकांच्या साह्याने येते.



Scanned with OKEN Scanner

रुपिमांची समान अर्थाची असंख्य रूपे आढळतात. त्यांना भाषाविज्ञानामध्ये रुपिकांतर म्हणतात. ही रुपिकांतर सर्व भाषेमध्ये पहावयास मिळतात. मराठीतील उदाहरण खालीलप्रमाणे –

१. अजय**नी** काम केलं.

   अजय**नं** काम केलं.

२. मी हे काम क**री**न.

   मी हे काम क**रे**न.

प्रस्तुत वाक्यातून अजयनी, अजयनं आणि करीन, करेन याचे अर्थ समान असल्याने नी, नं किंवा री, रे ही रूपे रुपिकांतरे आहेत. रूपाचे असे जे समूह कार्याच्या दृष्टीने आपण कल्पितो त्यांना रूपिका असे संबोधतो. रुपिमामध्ये समाविष्ट होणाऱ्या रुपांना त्या रुपिमाचे रुपिकांतर असे संबोधतात. रुपाचे रुपिमामध्ये वर्गीकरण करताना खालील बाबीचा काळजीपूर्वक विचार केला जातो असे मत डॉ. पुंडे यांनी व्यक्त केले आहे.

१. ती रूपे अर्थदृष्ट्या समान असावीत.

२. ती रूपे रुपदृष्ट्या समान असलीच पाहिजेत असे नाही.

३. त्या रूपांच्यामध्ये पूरक विनिमय अथवा मुक्त परिवर्तन असायला पाहिजे.

४. ती रूपे व्याकरणीक संख्येच्या संरचनेच्या दृष्टीने समान असायला हवीत.

उच्चारण विभाजनाच्या माध्यमातून त्याचे सार्थ लघुत्तम घटक आपल्याला प्राप्त करता येतात. अशा विभाजनातून रुपिमाचे वर्गीकरण केल्यास त्यातून रुपाना त्या त्या रुपिमाची रुपिकांतरे मिळतात. रुपे आणि रुपिकांतरे यामध्ये फारसा फरक नाही. दोन्हीही उच्चारणाचे सार्थ लघुत्तम घटक आहेत. रुप हे रुपिमनिरपेक्ष असते तर रुपिकांतर रुपिमसापेक्ष असते. म्हणून रुपिकांतराबद्दल सुचविताना हे अमुक रुपिमाचे रुपिकांतर असे सांगावे लागते.

रुपिमविचार म्हणजे रुपिकांतराच्या समूहाचा प्रतिनिधी. रुपिकांतर हे भाषेतील घटना होय. तर रुपिम ही प्रत्यक्ष घटना नसून भाषेचा संरचनेचा लघुत्तम घटक असतो. रुपिकांतराचा अनुभव घेता येतो. पण रुपिमाचा अनुभव घेता येत नाही. रुपिमाची अभिव्यक्ती रुपिकांतराच्या रूपाने होते. भाषाव्यवहाराचा विचार करता एखाद्या रुपिमाला एकच रुपिकांतर असते. तर काही वेळा अनेक रुपिकांतरे असतात. उदाहरणार्थ, 'कवी' या रुपिमाला एकच रुपिकांतर आहे. तर 'सुन' या रुपिमाला सून/सुने/सूना इत्यादी रुपिकांतरे आहेत. रुपिमविचाराची श्री. न. गजेंद्रगडकर यांनी सांगितलेली लक्षणे पुढीलप्रमाणे :

१. रुपिम स्वनिमांशी संबंधित असतात. तो संबंध पुष्कळ वेळा प्रत्यक्ष असतो, सरळ असतो. काही वेळा तो वरवर दिसत नाही. शोधून काढावा लागतो.

२. रुपिमाच्या माध्यमातून आशय व्यक्त होतो.



Scanned with OKEN Scanner

३. रुपिमाना व्याकरणातील एकात्मता असते.

४. रुपिम लघुत्तम घटक असून त्याचे आणखी विभाजन होऊ शकत नाही.

**रुपिकांतर**

रुपिमांची अनेक रूपे रुपिकांतर होय. उदा. माणूस या रुपिमाची माणूस, माणसे, माणसं ही रुपिकांतरे होय. रुपिकांतराला अभिव्यक्ती असते तर रुपिम ही मात्र अमूर्त वर्ग कल्पनाच होय. रूपिकेलाच रुपिमांच्या संदर्भात रुपिकांतर म्हणतात. रुपिकांतर ही रुपिमसापेक्ष संकल्पना होय.

## ३.२ रुपिकांतराचे प्रकार

### १. स्वनिमाश्रयी रुपिकांतर

इंग्रजी व्याकरणामध्ये अनेक वचनासाठी 'स, ज, इज' इत्यादी रूपांतरात हा प्रकार पहावयास मिळतो. 'स' हे रूप अघोष वर्णानंतर येते. उदा. कॅट-कॅटस्, 'इज' हे पद स्पर्शसंघर्षी आणि घर्षक वर्णानंतर येते. उदा. रोज-रोजिस आणि 'ज' हे पद सघोष वर्णानंतर येते. उदा. डॉग-डॉग्ज याचा अर्थ सरळ अर्थ स, ज, इज इत्यादी रूपे अगोदरच्या पदातील शेवटच्या स्वनिमावर अवलंबून आहेत. म्हणून त्यांना स्वनिमाश्रयी रुपिकांतर असे संबोधतात.

### २. रुपिमाश्रयी रुपिकांतरे

ही रुपिकांतरे अगोदरच्या रूपाच्या शेवटी येणाऱ्या स्वनिमावर अवलंबून नसून त्या विशिष्ट रुपिमावरच अवलंबून असतात. म्हणून त्यांना रूपिकाश्रयी रुपिकांतरे असे संबोधतात. उदा. मराठीतील असत्य, अन्याय, अनोळखी, अनमान इत्यादी शब्दातील 'अ' आणि 'अन्' हे रुपिम स्वनिमावर आधारित नसून सत्य, न्याय, ओळखी, मान इत्यादी रुपिमावर आधारित आहेत. 'हो' धातूचे 'हा' हे रूप आणि 'जा' धातूचे 'जे' हे रूप रुपिमाश्रयी रुपिकांतराची उदाहरणे आहेत.

### ३. शून्य रुपिकांतर

वाक्यामध्ये काही वेळा कर्तृत्वस्थानी अथवा कर्मस्थानी येणारी रूपे प्रत्ययविरहित असतात. अशा वेळी त्या रुपिमाला रुपिकांतर मानावे काय ? असा एक प्रश्न उपस्थित होतो. विशेषतः प्रथम किंवा द्वितीय पुरुषी कर्त्याच्या बाबतीत हे पहावयास मिळते.

मी अन्याय केला.

तू भाजी आणलीस.

या उदाहरणात कर्त्यांना लागणारा तृतीयेचा 'ने' प्रत्यय लागत नाही. परंतु अर्थ मात्र तसा आहे. म्हणून येथे 'शून्य' प्रत्यय आहे. अनेकवचनी 'दास' रुपिम, एकवचनी 'दास' मानावे लागेल.



Scanned with OKEN Scanner

**रुपिम** : वैधर्म्ययुक्त विनियोगामुळे ज्या दोन रूपिका भिन्न ठरविल्या जातात त्यांना रुपिम असे म्हणतात. माणूस, लेखक, पुस्तक, वर, खाली ही रुपिमांची उदाहरणे होत. रुपिम ही प्रत्यक्ष भाषिक घटना नसून रुपिकांतर हीच भाषिक घटना असते. कारण भाषेत उच्चारले जाते ते रुपिकांतर असते रुपिम नव्हे. रुपिकांतराच्या समूहाचा वर्ग म्हणजे रुपिम होय.

## ३.३ रुपिमाचे प्रकार

**१. आशयबोधक रुपिम** : रुपिम जेव्हा व्यवहारातील मूर्त अथवा अमूर्त वस्तूचा सूचक वा निर्देशक असतो तेव्हा रुपिमाला स्वतःचा एक अर्थ असतो. उदा. आई, भाऊ, घर, शाळा हे रुपिम कोणता ना कोणता आशय निर्देशित करतात म्हणून या रुपिमांना आशयबोधक रुपिम असे संबोधतात.

**२. कार्यकर रुपिम** : काही रुपिमांना आशयबोधक रुपिमाप्रमाणे स्वतःचा अर्थ नसतो. म्हणजे ते अर्थशून्यही नसतात. मात्र वाक्यातील रुपिमांना विशिष्ट अर्थाने जोडण्याचे कार्य करतात. त्यांच्यातील संबंध स्पष्ट करतात. अशा रुपिमांना कार्यकर रुपिम म्हणून संबोधतात.

त, ने, ला, चा हे प्रत्यय या प्रकारात येतात. या प्रत्ययांमुळे कोणताही अर्थनिर्देश होत नसला तरी मूळ शब्दांना जोडून योजले जातात. तेव्हा अर्थपूर्ण रचना होते. नाम, सर्वनाम यांना लागणारे विभक्तीप्रत्यय आणि धातूंना लागणारे आख्यात प्रत्यय (काळ, अर्थ इत्यादीचे प्रत्यय) ही सर्व कार्यकर रुपिमांची उदाहरणे होत.

**३. मुक्त रुपिम** : भाषेतील काही रुपिम स्वतंत्र असतात. त्यांना स्वतंत्र किंवा मुक्त रुपिम म्हणतात. मी, पुस्तक आणि वर इत्यादी रुपिम अर्थपूर्ण असून ते वाक्यात स्वतंत्रपणे किंवा प्रत्ययासह योजल्याने रुपिकांतराच्या स्वरूपात येतात. मुक्त रुपिमांची रुपिकांतरे होऊ शकतात.

**४. बद्ध रुपिम** : भाषेतील काही रुपिम स्वतंत्रपणे येऊ शकत नाही. त्यांचा उपयोग इतर रुपिमांच्या आश्रयाने होतो. अशा रुपिमांना पराश्रयी किंवा बद्ध रुपिम म्हणतात. उदा. ईल, णार, साठी प्रमाणे अ, अन्, यथा, प्रति हे प्रत्यय जाईल, जाणार, जाण्यासाठी, राजाप्रमाणे, अन्याय, अनोळखी, यथाशक्ती, प्रतिदिन याप्रमाणे वापरले जातात. रुपिमांना लागणारे पूर्व प्रत्यय वा उत्तर प्रत्यय विभक्ती आणि आख्यात प्रत्यय ही बद्ध रुपिमांची उदाहरणे होत.

रुपिमांचे लेखन करण्यासाठी { } अशा महिरपी कंसाचा उपयोग करतात. तर रुपिकांतराचे लेखन तिरप्या रेषांच्या // कंसात करतात.

## ३.९ समारोप

रूप, रुपिम आणि रुपिकांतर या संज्ञांसाठी काही अभ्यासकांनी पद, पदिम, पदांतर या संज्ञा वापरल्या आहेत. पदविचार आणि रुपिमविचार एकसारखाच आहे. त्यात कोणत्याही प्रकारचा फरक नाही. म्हणून संक्षेपानेच त्यांचा परामर्श घेणे योग्य ठरेल.



Scanned with OKEN Scanner

## ३.१० स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

**प्रश्न : (अ) योग्य पर्याय निवडा.**

१. मानवी मुखावाटे बाहेर पडणाऱ्या ध्वनींना काय म्हणतात ?

(अ) वाक्य (ब) उद्‌गार (क) ध्वनी (ड) भाषा

२. शास्त्रीय पद्धतीने स्वनविचार करणाऱ्या शास्त्राला काय म्हणतात ?

(अ) शास्त्र (ब) विज्ञान (क) स्वनविज्ञान (ड) ध्वनी.

३. स्वनविज्ञानाच्या एकूण किती शाखा आहेत ?

(अ) दोन (ब) तीन (क) चार (ड) पाच.

४. वातावरणात प्रसृत झालेला स्वन कोणाकडून ग्रहण केला जातो ?

(अ) वक्त्याकडून (ब) श्रोत्याकडून (क) प्राण्याकडून (ड) पक्ष्याकडून

**उत्तरे** : १-क, २-क, ३-ब, ४-ब.

**(ब) चूक की बरोबर लिहा.**

१. परंपरेने भाषेत स्वीकारण्यात आलेले स्वन कालांतराने बदलू शकतात.

२. ऌ हे ध्वनी स्वनविज्ञानाच्या दृष्टीने मराठीच्या वर्णमालेतून काढून टाकायला हवेत.

३. मराठी वर्णमालेत ॲ, ऑ हे ध्वनी नव्याने समाविष्ट करून घ्यावे लागले आहेत.

४. स्वन हे भाषानिरपेक्ष असतात.

**उत्तरे** : १-बरोबर, २-बरोबर, ३-बरोबर, ४-चूक.

**(क) गाळलेल्या जागा भरा.**

१. विद्‌भेदकता हे ......... चे लक्षण आहे.

२. आधुनिक भाषाविज्ञानाचा पाया ......... त्यांनी घातला.

३. उद्देश व विधेय हे वाक्याचे ......... होत.

४. भाषेतील सर्वात मोठी रचना ......... असते.

**उत्तरे** : १-स्वनाचे, २-सोस्यूर, ३-प्रथमोपस्थित, ४-वाक्य.



Scanned with OKEN Scanner

**(ड) योग्य जोड्या जुळवा.**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| १. डॉ. महेंद्र कदम | अ- सुलभ भाषाविज्ञान |
| २. डॉ. द. दि. पुंडे | ब-भाषाविज्ञान आणि मराठी भाषा |
| ३. डॉ. अनिल गवळी | क-भाषा आणि भाषाविज्ञान |
| ४. डॉ. रमेश घोंगडे | ड-मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान |

**(इ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दोन निरनिराळे अर्थ एकाच रुपिमाने दर्शवितात त्यांना कोणते रुपिम म्हणतात ?

२. श्री. गजेंद्रगडकर यांनी केलेली स्वनाची व्याख्या सांगा.

३. स्वनविचारास भाषाशास्त्रात कोणत्या नावाने संबोधले जाते ?

४. क, ट, प सारख्या ध्वनींना भाषाविज्ञानात कोणत्या नावाने संबोधतात ?

**उत्तरे** : १. मिलन रुपिम,

२. स्वन म्हणजे भाषेत उपयोगात आणलेला ध्वनी

३. स्वनविज्ञान,

४. स्वनिम.

**प्रश्न : दीर्घोत्तरी प्रश्न**

१. स्वन-स्वनिम-स्वनांतर या संकल्पना सविस्तर लिहा.

२. रूपिका-रुपिम-रुपिकांतर या संकल्पनांची विस्ताराने मांडणी करा.

**प्रश्न : लघुत्तरी प्रश्न**

१. स्वनिम निश्चितीची तत्त्वे

२. स्वनविचार स्पष्ट करणाऱ्या दोन व्याख्या सांगा.

३. रुपिमाचे प्रकार थोडक्यात सांगा.

४. स्वनिम विनियोगाचे प्रकार सांगा.



Scanned with OKEN Scanner

**प्रश्न : टिपा लिहा.**

१. रूपिका

२. स्वनिम

३. वैधर्म्ययुक्त स्वनिम विनियोग

४. पूरक स्वनिम विनियोग

५. शून्य रुपिकांतर

**मुलभूत वाचन**


| | | |
|---|---|---|
| १. | जोशी प्र. न. | सुबोध भाषाशास्त्र, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. |
| २. | गवळी, अनिल | भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर. |
| ३. | धोंगडे रमेश | भाषा आणि भाषाविज्ञान, दिलीपराज प्रकाशन, पुणे |
| ४. | कानडे, मु. श्री. (संपा.) | मराठीचा भाषिक अभ्यास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. |
| ५. | गजेंद्रगडकर श्री. न. | भाषा आणि भाषाशास्त्र, व्हीनस प्रकाशन, पुणे. |
| ६. | हिरेमठ राजशेखर | मराठी व्याकरण परिचय, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. |
| ७. | Hocket C. F. | A course in Modern Linguistics, Oxford, New York, 1958. |


**पूरक वाचन**


| | | |
|---|---|---|
| १. | कुलकर्णी कृ. पां. | मराठी भाषा : उद्‌गम आणि विकास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. |
| २. | मालशे, मिलिंद | आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, लोकवाङ्मयगृह, मुंबई. |
| ३. | कुलकर्णी सुलक्षणा व कुबेर वसंत | भाषाविज्ञान परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर. |
| ४. | दामले मो. के. | शास्त्रीय मराठी व्याकरण, दामोदर सावळाराम आणि मंडळी, पुणे. |




Scanned with OKEN Scanner

## संदर्भ ग्रंथ


१. मालशे, पुंडे, सोमण (संपा.)भाषाविज्ञानपरिचय, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

२. पुंडे द. दि. सुलभ भाषाविज्ञान, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

३. कदम महेंद्र मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

४. काळे, कल्याण / सोमण अंजली (संपा.) आधुनिक भाषाविज्ञान, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

५. पाटील व्ही. एन. सुलभ भाषाविज्ञान व मराठी व्याकरण, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव. आ. दु. २, २०१६.




Scanned with OKEN Scanner